| | | |
|---|---|---|
| | जिल्हा शल्यचिकित्सक यांचे कार्यालय,<br>जिल्हा रुग्णालय,सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी ता.कुडाळ<br>पिनकोड – ४१६८१२ | NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र |
| दुरध्वनी क्रमांक (०२३६२) २२८६५४ | | ई मेल ntcp.sindhudurg@gmail.com |
| जा.क्र.जिरुसिं/एनसीडी-एनटीसीपी/ १9।1/२०२४ | | दिनांक :- 26/12/2024. |


आरोग्य सेवा

## दरपत्रक सूचना

विषय :- जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे कंत्राटी पध्दतीने वाहन सेवा घेणे करीता दरपत्रके सादर करणे बाबत....

उपरोक्त विषयास अनुसरुन राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे कंत्राटी पध्दतीने वाहन सेवा घेणे करीता वितरक, पुरवठादार यांचेकडून विहित नमुन्यात दरपत्रक मागवित आहोत. सदर दरपत्रक मा. संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, मुंबई यांचे http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे. सदरचे दर सर्व करासहीत आपले संस्थेच्या लेटरहेडवर खालील तपशिला प्रमाणे सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर "एनटीसीपी कार्यक्रमांतर्गत **कंत्राटी वाहन सेवेसाठी दरपत्रक** " असा स्पष्ट उल्लेख करावा.

### दरपत्रकाकरीता नियोजीत कालावधी

| अ. क्र. | तपशिल | दिनांक व वेळ आणि पत्ता |
|---|---|---|
| १ | मोहोरबंद दरपत्रके सादर करण्याचा कालावधी | दि. २६/१२/ २०२४ ते दि. ०१/०१/ २०२5 (कार्यालयीन वेळेत) |
| २ | दरपत्रके उघडणे व मुल्यांकनाचा दिनांक | दि. ०२/०१/ २०२5 सकाळी ११.०० वाजता (सदर तारीख काही तांत्रीक बार्बीमुळे बदललेस उपस्थित दरपत्रकधारकांना कळविणेत येईल.) |
| ३ | कार्यालयाचा पत्ता | जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय,एनएचएम विभाग,सिंधुदुर्ग |
| ४ | वार्षिक अंदाजीत रक्कम (एक वाहनांकरीता ) | रु.१,०१,२५०/- |
| ५ | वाहन सेवेचा कालावधी | वाहन सेवा सुरु दिनांका पासून ते दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत |
| ६ | एका वाहनाचे मासिक भाडे मर्यादा | कमाल दर २००० कि.मी करीता रु.२५०००/- मर्यादा |

Scanned with OKEN Scanner

## दरपत्रके सादर करणेबाबच्या सुचना :-

१. सदर कंत्राटी वाहन सेवे बाबत स्थानिक पुरवठादांरानीच (सिंधुदुर्ग जिल्हा )दरपत्रक भरणेचे आहे. जिल्हयाबाहेरील कोणतेही दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

२. सिलबंद लखोटयामध्ये एकच दरपत्रक असलेबाबत तसेच सेवा खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा सबंध नसल्याबाबत " दरपत्रकाराचे हमी पत्र" विहीत प्रपत्र अ सोबत जोडणे आवश्यक आहे.

३. सिलबंद लखोटयावर एनटीसीपी कार्यक्रमाअंतर्गत **कंत्राटी वाहन सेवेसाठी दरपत्रक** असा उल्लेख असणे आवश्यक आहे. अन्यथा आपले दरपत्रक ग्राहय मानले जाणार नाही.

४. दरपत्रक जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, एनएचएम विभाग येथे सादर करणेची आहेत.

५. सर्व दर हे सर्व करांसहीत असावेत.

६. दरपत्रक लेटरहेडवर सही व शिक्क्या सह सादर करावे, तसेच त्यावर GST असल्यास क्रमांक व PAN कार्ड क्रमांक नमूद करण्यात यावा.

७. दरपत्रक विहित नमुन्यात व मुदतीत या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

८. मुदतीनंतर (उशिरा) प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

९. अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

१०. दरपत्रकामध्ये खाडाखोड (Over writing) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही.

११. दरपत्रकात नमूद केलेले दर हे उपलब्ध बाजारभावापेक्षा जास्त नसावेत.

१२. विहीत नमुन्यात सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

१३. प्रशासकीय अथवा तांत्रिक कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब/उशिर झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

१४. दरपत्रकासोबत व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (शॉप अॅक्ट) ,पॅन कार्ड आणि जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.

१५. अनुदानाच्या उपलब्धतेनुसार व कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार वाहनांच्या संख्येत आणि वाहनाच्या मुदतीत बदल होऊ शकतील.

१६. कोणतेही लेखी कारण न देता दरपत्रक स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार जिल्हा शल्यचिकित्सक सिंधुदुर्ग यांना राहील.

१७. वाहनाची संख्या कमी जास्त करण्याचे पुर्ण अधिकार जिल्हा शल्यचिकित्सक सिंधुदुर्ग यांना राहील.

Scanned with OKEN Scanner

**वाहन सेवे बाबत अटी व शर्ती :-**

१. वाहनाची अधिकृत कागदपत्रे :- (स्पष्ट व स्वच्छ झेरॉक्स प्रत)

२. खालील दिलेल्या दरपत्रक नमुन्या मध्ये अ.क्र. १ ते १५ मधील सर्व बाबींची कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.

३. वाहनाचे मॉडेल १ जानेवारी २०१८ अथवा त्या नंतरचे असावे. तत्पुर्वीच्या वाहनाचा विचार केला जाणार नाही. वाहनाची नोंदणी महाराष्ट्र राज्यामध्ये केलेली असावी.

४. दरपत्रक नमुन्या मध्ये दर बिनचूक व स्पष्ट अक्षरात भरणेच आहे. खाडाखोट केले असलेस सदर दरपत्रक अपात्र करणेत येईल.

५. सदर http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील प्रसिध्द करणेत आलेल्या नोटीस मधील सुचनेनुसार सादर करावयाची आहेत.

६. वाहन मारुती सुझुकी स्विपट डिझायर/मारुती सुझुकी बलोनो/होंडा अमेज व महिंद्रा बोलेरो/टाटा सुमो या प्रकारचे वाहन (ए.सी.सहित) आवश्यक आहे.

७. खालील ७.१ ते ७.५ वरील मधील सर्व खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे हे गृहीत धरुन दर भरावेत.

७.१. डिसेल, पेट्रोल, ऑईल व ल्युब्रींकटस इत्यादी.

७.२. अल्प आणि मोठी दुरुस्ती/नियमित मेंटेनन्स/स्वच्छता इत्यादी सर्व दुरुस्त्यासह.

७.३. चालकाचा मासिक पगार, टी.ए.डी.ए., बोनस इ. सर्व वाहन मालकाने स्वतःअदा करावयाचा आहे. (वाहन २४ तास राहील्यावरही ओव्हर टाईम ची जबाबदारी पुरवठादाराची राहील.)

७.४. टोल, टॅक्स व पार्कींग चार्ज, एअर कंडिशन चार्जेस.

७.५. सर्व अधिभार व कर, वेळोवेळी शासनाने लागू केलेले सर्व कर आणि लेव्ही पूरवठादार/संस्था यांना अदा करावा लागेल.

८. मंजूर पुरवठादार/एजन्सी/संस्था व जिल्हा शल्यचिकित्सक,सिंधुदुर्ग यांचे मध्ये सर्व अटी व शर्ती नमुद करुन एक करार करण्यात येईल या करारावर दोन्ही संस्थाच्या प्रतिनिधीच्या स्वाक्षऱ्या असतील.सदर करारान्वये कामाची सुरुवात यशस्वी दरपत्रकाधारकांने सर्व अटी व शर्ती मंजूर कलेल्या तारखेपासून सुरु होईल. करारातील अटी व शर्ती पुरवठादार/एजन्सी/संस्था कडून उल्लघंन झाल्यास सदरचा करार रद्द करण्यात येईल.

९. मंजूर दरपत्रकधारकास वाहनांची सर्व मुळ कागदपत्रे योग्य असल्याचे प्रमाणित करणेसाठी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

१०. मंजूर कलेले दर हे दरपत्रक मंजूरीच्या दिनांका पासून दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत लागू राहतील.

११. दरपत्रकातील वाहन प्रती माह २००० कि.मी. च्या वर अतिरिक्त धाव झाल्यास,झालेली अतिरिक्त धाव ही प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) यांनी मंजूर केलेल्या दर व आपण दरपत्रकामध्ये सादर केलेले दर या दोन्ही पैकी जो कमी दर असले त्या प्रमाणे देय असेल.

१२. वाहनासोवत नियीमत वाहनाची सर्व मुळ कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

१३. मंजूर दरपत्रकधारक/एजन्सी/संस्था यांच्या प्रत्येक वाहनांचा वैध अपघात विमा (Full Insurance) असणे नुतनीकरण पुरवठादाराने त्यांच्या स्तरावरुन मुदत संपण्याआधी १ महिन्यापुर्वी करणे आवश्यक आहे.

१४. करार वैध असणेच्या कालावधीमध्ये दुर्देवाने अपघात घडल्यास सदर अपघातामुळे झालेल्या जिवित व वित हानीची कोणतीही जबाबदारी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय,सिंधुदुर्ग कार्यालय स्विकारणार नाही.

Scanned with OKEN Scanner

१५. या दरपत्रकामध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरामध्ये संदिग्धता असेल अशी दरपत्रके अपात्र ठरविण्यात येतील.

१६. जर अक्षरी व अंकी दरामध्ये तफावत असल्यास दोन्ही पैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

१७. दरपत्रकेतील अटी व शर्तीबाबत काही शंका असल्यास दरपत्रके सादर करण्यापुर्वी प्रत्यक्ष कार्यालयात येऊन शंकेचे निरसन करुन घ्यावे. ऐनवेळी कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. तसेच ,करारनामा करताना सविस्तर पूर्ण पत्ता,आधारकार्ड, रेशनकार्ड फोन/भ्रमणध्वनी क्रमांक देणे आवश्यक आहे.

१८. नमुद केलेले दर हे कराराचे पूर्ण कालावधीसाठी कायम राहतील व कोणत्याही सबबीखाली मंजूर दरात वाढ केली जाणार नाही. दर हे रुपयात नमूद करणे व सर्व प्रकारच्या करासहीत दर नमुद करावेत.

१९. दरपत्रकधारक कंत्राटदार/एजन्सी/संस्था ही प्रचलित कायद्यानुसार नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

२०. वाहनचालक - संस्थेने खात्री करुन घ्यावी की, वाहन चालक हा शिक्षित, चांगली वर्तवणूक असलेला, गणवेशधारी, व वाहतूक कायद्याची तसेच रस्ते व महामार्गाची माहिती असलेला, वाहन चालक परवाना असलेला व अन्य आवश्यक ती कागदपत्रे असणारा असावा.

२१. सेवा पुरविताना नियमितपणा, सचोटी, स्वच्छता, आज्ञाधारकता व त्वरीत कारवाई बाबत कोणतेही तर कोणतेही पुर्व सुचना न देता करार रद्द करण्यात येईल.

२२. मंजूर दरपत्रकधारक कंत्राटदारक/एजन्सी/संस्था यांनी वाहने ताब्यात देतेवेळी वाहनांची सर्व कागदपत्रे (नोंदणीकर, विमा, फिटनेस, वाहनचालकाची अनुज्ञप्ती) इ. वैध असणे आवश्यक आहे. यापैकी कोणत्याही बाबींच्या अभावामुळे होणाऱ्या कोणत्याही परिणामांना हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. याची पूर्ण जबाबदारी मंजूर दरपत्रकधारक/एजन्सी/संस्था यांची राहील.

२३. दरपत्रकधारकाच्या देयकातून नियमानुसार आयकर, सेवाकर व त्यावरील अतिरिक्त कर कपात करण्यात येईल. पुरवठादारास कोणत्याही प्रकारची अग्रीम देण्यात येणार नाही.

२४. वाहनांच्या वापराबाबत वाहनांचे कर,विमा,प्रदुषण इत्यादी बाबत शासनाच्या अस्तित्वात असलेल्या सर्व नियमांचे पालन करण्यास मंजूर दरपत्रकधारक कंत्राटदारक/एजन्सी/संस्था बांधिल राहील.

२५. दरपत्रक मंजूर झाले नंतर सोबत सादर करण्यात येणाऱ्या वाहनांच्या मालकीबाबत व ते संपूर्ण कंत्राटी कालावधीकरीता वाहन वापरण्यास योग्य असल्याबाबत सक्षम परिवहन अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्राची (RC BOOK WITH FITNESS CERTIFICATE) सांक्षाकित केलेली सत्यप्रत या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील.

२६. दरपत्रकामधील दरांची तुलना हि सर्व करसहीत दिलेल्या दरांवर केली जाईल. त्याबाबत कार्यालयाचा निर्णय अंतिम राहिल.

२७. कराराच्या दरम्यानच्या काळात शासकीय करामधील कराची व वाहनांच्या भागांची टायर, ल्युब्रीकंटस, डिझेल आदिंच्या किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाहीत/तशी मागणी करता येणार नाही.

२८. ज्या कालावधीत वाहन वाहनचालक उपलब्ध नसेल त्या कालावधीमध्ये दुसऱ्या वाहनाची व वाहन चालकाची पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ती न केल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी जो खर्च केला जाईल तो देयकांतून वसूल करणेत यईल. कोणत्याही कारणामुळे विहित वेळेत वाहन उपलब्ध करुन न दिल्यास पहिला एक तास वगळता पुढील प्रत्येक तासासाठी किंवा तासाच्या भागासाठी रु. २००/- (रुपये दोनशे मात्र ) इतकी देय रकमेतून वजा केली जाईल अथवा वसूली केली जाईल.

२९. वाहन धारकाने वाहन दिलेल्या कालावधीकरीता वापरण्यास सुस्थितीत असणे आवश्यक आहे. वाहन सुस्थितीत न आढळल्यास करार रद्द करण्यात येईल.

३०. कामावर असताना कोणतीही दुर्घटना झाल्यास अथवा पुरवठादाराच्या/संस्थेच्या कर्मचाऱ्यास दुखापत/मृत्यू झाल्यास सदरची नुकसान भरपाई/मोबदला देण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची

Scanned with OKEN Scanner

राहील. तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट बाबी अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी पूरवठादाराची राहील. या अनुषंगाने नियमानुसार योग्य ते इन्शुरन्स करण्याची जबाबदारी पूरवठादाराची राहील. याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, सिंधुदुर्ग कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

३१. वाहन २४ तास जिल्हा शल्यचिकित्सक कर्यालयामध्ये उपस्थित असणे बंधनकारक आहे.

३२. सुट्टीच्या दिवशी (म्हणजेच रविवार सार्वजनिक सुट्या कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या सूट्या इ. ) दिवशी गरज भासल्यास आपले वाहन उपस्थित ठेवणे बंधनकारक आहे. तसेच महत्वाच्या कार्यक्रमादिवशी गरज भासल्यास आपणास पूर्वसुचना देण्यात येईल.

३३. वाहन दौऱ्यावर/फिरतीवर जाणेपुर्वी वाहनामध्ये पुरेसे इंधन असणे आवश्यक आहे व याची सर्वस्वी जबाबदारी वाहन मालकाची/पूरवठादारची असेल.

३४. वाहनाची आसन क्षमता चालकासह 6+1 पेक्षा कमी नसावी.

३५. इंधन व वंगण दुरुस्ती व वाहनचालकाचा खर्च वाहन पुरवठादाराने करावा लागेल.

३६. वाहनाची किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे ही वाहन ठेकेदाराची जवाबदारी राहील.

३७. फास्ट टॅग रजिस्टेशन असणे आवश्यक आहे.

३८. पुरवठादाराने अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. दरपत्रक मंजूर झालेल्या पूरवठादाराने/संस्थेने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच पुर्व सुचनेशिवाय दरकरार रद्द करण्यात येईल आणि मंजूर पूरवठादाराने/संस्थेने नाव काळया यादी मध्ये सामाविष्ट करणेची कारवाई केली जाईल.

३९. प्रत्येक महिन्याचे लॉगबुक हे पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत प्रत्यक्ष लॉगबुकातील कि.मी. च्या आधार दरपत्रकामतील निश्चित दराने देयके तयार करुन ती जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय सादर करणेचे आहे.

४०. कार्यालयाकडे कार्यरत असलेले कंत्राटी वाहन मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांचे पुर्व परवानगी शिवाय वाहन कार्यालयाच्या बाहेर नेणेचे नाही.

४१. वाहन भाडयाने घेण्याच्या अटी व शर्तीमध्ये पुर्णतः अथवा अंशतः बदल करणे तसेच काही तांत्रिक अडचणीमुळे दरपत्रक नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता दरपत्रक प्रक्रिया रद्द करणेचा अधिकार मा. जिल्हा शल्यचिकित्सक,सिंधुदुर्ग यांनी राखून ठेवलेला आहे.

४२. सदर दरपत्रके प्रक्रियेवावतच्या न्यायप्रविष्ठ बाबी सिंधुदुर्ग जिल्हयाच्या न्याय परिक्षेत्रात मर्यादीत राहतील.

४३. सदर वाहनास सिंधुदुर्ग जिल्हा अंतर्गत फिरती व राज्यस्तरीय विविध सभा कार्यशाळेकरीता व जिल्हा शल्यचिकित्सक यांचे सुचनेनुसार जिल्हया बाहेर जावे लागेल.

दरपत्रक बाबतच्या माहितीसाठी कृपया खालील ठिकाणी संपर्क साधावा.

वेबसाईट :- http://arogya.maharashtra.gov.in

कार्यालयाचा पत्ता :- जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय,
एन.एच.एम.कक्ष जिल्हा सामान्य रुग्णालय,ओरोस.

जिल्हा शल्यचिकित्सक
सिंधुदुर्ग

प्रत/- नोटीस बोर्ड

Scanned with OKEN Scanner